* परिवहन समिती *    सप्टेंबर

# प्रोसिडींग बुक

मिटींग क्र. 08
मिटींग दि. २२/०९/२

## विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती

शाळा : मो. गो. मथुरावाला प्रा. वि. ता. हवेली जि. पुणे सन २०२५-२६
वानवडी, पुणे ४०

आज दि. २२/०९/२५ रोजी मा. अध्यक्ष ~~श्री~~/सौ/~~श्रीमती~~ सौ. सीमा राठोड (मुख्या.) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीची बैठक घेण्यात आली.
बैठकीत खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

### उपस्थिती पत्रक

| अ.क्र. | नांव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | सौ. सीमा राठोड (मुख्या.) | अध्यक्ष | [signature] |
| २. | सौ. मीना माने (पालक संघ) | सदस्य | मीना. |
| ३. | श्री. आर. एस. मुल्ला | सदस्य | R.S.Mulla |
| ४. | सौ. वाले संगीता (शिक्षक) | सदस्य | [signature] |
| ५. | श्रीमती. धोंडे अस्मिता (शिक्षक) | सदस्य | [signature] |
| ६. | श्री. वाडकर किरण (वाहतुक) | सदस्य | Wadkar |
| ७. | श्री. साठे विकास | सदस्य | विकास |
| ८. | श्री. प्रविण मदने | सदस्य | Pravin |
| ९. | श्री. देवीदास ठोके | सदस्य | Devidas. |
| १०. | | सदस्य | |
| ११. | | सदस्य | |
| १२. | | सदस्य | |
| १३. | | सदस्य | |
| १५. | | सदस्य | |
| १६. | | सदस्य | |
| १७. | | सदस्य | |
| १८. | | सदस्य सचिव | |
| १९. | | सदस्य | |

### विषय पत्रिका

मागील प्रोसिडिंग वाचुन मंजुरी देणे.

दि. २२/०९/२५ रोजी कै. श्री. मो. गो. मथुरावाला प्राथमिक विद्यामंदिर वानवडी, पुणे-४० शाळा सौ. सीमा राठोड मॅडम (मुख्याध्यापिका) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी सुरक्षा समिती अंतर्गत परिवहन समितीची सभा घेण्यात आली.

सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

ऐनवेळी येणारे विषय —

* विषय क्र ०१ :- विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सुनियोजित सुरक्षित वाहतुक व्यवस्था करणेबाबत.

* ठराव क्र :- ०१ :- विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सुनियोजित सुरक्षित वाहतुक व्यवस्थेची आवश्यकता खूप महत्त्वाची आहे. यासाठी काही उपाययोजना या सभेमध्ये ठरविण्यात आल्या.
वाहतूक नियोजन, स्कूल बस सेवा, सुरक्षितता जागरूकता, पोलिस आणि स्थानिक प्रशासनाची मदत, वाहन चालकांची शिक्षण - शाळेतील वाहन चालकांना योग्य शिष्टाचार आणि सुरक्षिततेची माहिती देणे या सर्व उपाययोजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सुरक्षित आणि सुनियोजित वाहतुक व्यवस्था निर्माण करता येईल, असे या सभेतून ठरविण्यात आले व तसा ठराव देखील मंजूर करण्यात आला.

* सूचक :- सौ. वाले संगीता

* अनुमोदक :- सौ. भोसले प्रियांका

* विषय क्र :- ०२ चालकांना वाहन चालविताना नियमावली ठरविणे.

* ठराव क्र :- ०२ :- शालेय वाहन चालविताना लक्षात ठेवण्यासारखी नियमावली खालीलप्रमाणे ठरविण्यात आली की,
* वाहनाची तपासणी :- प्रत्येक वेळी वाहन

चालविण्यापूर्वी वाहनाची तपासणी करा. (ब्रेक, टायर्स, लाइटस् इ.) लायसन्स, सीटबेल्ट गतीमर्यादा, रस्त्याचे चिन्ह, सर्व ट्रॅफिक सिग्नल्स् आणि रस्त्यावरील चिन्ह्यांचे पालन करा.

पादचारी रस्ता, मोबाईल फोन - वाहन चालविताना मोबाइल फोनचा वापर टाळणे.

या नियमांचे पालन करून शालेय वाहतूक अधिक सुरक्षित आणि व्यवस्थीत ठेवता येईल. अशा पद्धतीने या सभेत चालकांना वाहन चालविताना नियमावली ठरविण्यात आली. व यावर सखोल अशी चर्चा करण्यात आली.

* सूचक :- श्री. धोंडे अस्मिता

* अनुमोदक :- सौ. माने मिना.

* विषय क्र :- 03 :-
गाडीत प्रथमोपचारपेटी असण्याबाबत.

* ठराव क्र :- 03 :-
गाडीत प्रथमोपचारपेटी असणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषत: शालेय वाहने चालविताना. त्यामुळे कोणत्याही आपातकालीन परिस्थितीत त्वरित मदत करता येऊ शकते.

* काय समाविष्ट करावे :-
बँडेज, रॉकेट बँडेज, सॅनिटायझर व इतर जे आवश्यक सर्व साहित्य असणे गरजेचे आहे.

* पेटीचे ठिकाण :-
प्रथमोपचार पेटी गाडीत सहज उपलब्ध ठिकाणी ठेवा, जसे की डॅशबोर्ड किंवा गाडीच्या मागील बाजूस.

प्रथमोपचार पेटीची नियमितपणे तपासणी

करणे आणि आवश्यकतेनुसार सामग्री अद्ययावत करणे.

* प्रशिक्षण :- गाडी चालविणाऱ्या व्यक्तीने प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण घेतलेले असावे.

या सर्व बारीकसारीक बाबींवर चर्चा करण्यात आली

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

* सूचक :- सौ. राठोड मॅडम

* अनुमोदक :- सौ. वाले संगीता

* विषय क्र :- ०४ :-

परिवहन शुल्क निश्चित करणे.

* ठराव क्र :- ०४ :-

शाळेच्या बसचे परिवहन शुल्क निश्चित करताना, खालील विषयांवर चर्चा करण्यात आली. इंधन खर्च, गाडी देखभाल, चालकाच्या वेतन, इतर खर्च, वाहतूक परवाने, विमा, टोल आणि मार्ग, अंतर, विद्यार्थ्यांची संख्या, या सर्व मुद्द्यांचा विचार करून शाळेच्या बसचे परिवहन शुल्क ठरविले जाऊ शकते. हे सर्व मुद्दे विचारात घेणे महत्त्वाचे आहे. असे अध्यक्ष यांनी सुचविले. व तसा ठराव करण्यात आला.

* सूचक :- श्री. वाडकर किरण
* अनुमोदक :- श्री. साठे.

चहापानानंतर सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

*

मुख्याध्यापिका
कै. श्री. मो. गो. मथुरावाला
प्राथमिक विद्या मंदीर
वानवडी बाजार, पुणे-४३